मंजूर प्रादेशिक योजना, हिंगोली
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 च्या कलम 20(4) अन्वये अधिसूचना निर्गमित करण्याबाबत
मौ. बळसोंड ता. व जि. हिंगोली येथील गट.क्र. 141 (भाग) ही शेती विभागातील 1.10 हे. जमीन सार्वजनिक - निम सार्वजनिक विभागात समाविष्ट करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**
**एम.बी.सी.टॉवर, दुसरा मजला, बाबा पेट्रोल पंपा जवळ, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर** - 431001

निर्णय क्र./प्र.छा.स./प्रा.यो. हिंगोली /कलम-20(4)/मौ. बळसोंड, ता. व जि.हिंगोली/सहसंनरछसं/1480
दिनांक : 03/7/2024

**निर्णय :-** सोबतची अधिसूचना(मराठी/इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
मु.का., पुणे-१. आवक क्र. 8606
टिपीव्ही -१/२/३/४/५/६/७
11 JUL 2024
/१अ/२/लेखा/अर्थसंकल्प
मु प्र.अ./उ सं न र./सं न.र.

(र.ना.जायभाये)
सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती,
तथा
प्र.सहसंचालक, नगर रचना,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

प्रति,

1) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, (नवि-30), मंत्रालय मुंबई
2) मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर तथा मा.अध्यक्ष, प्रस्ताव छाननी समिती, छत्रपती संभाजीनगर
3) मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
(त्यांना विनंती करण्यात येते की, सदरची अधिसूचना नगर रचना संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी कृपया संबंधीतांना निर्देश द्यावेत)
4) जिल्हाधिकारी, हिंगोली
5) सहाय्यक संचालक, नगर रचना, हिंगोली शाखा, हिंगोली
(प्रस्तूत प्रकरणी छाननी समितीच्या उक्त निर्णयानुसार अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या 06 प्रती त्वरीत सादर कराव्यात)
6) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी भाग-1 मध्ये प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या प्रत्येकी 05 प्रती या विभागास, 1)संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे 2)सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर 3)सहायक संचालक, नगर रचना, हिंगोली शाखा, हिंगोली व 4) जिल्हाधिकारी, हिंगोली यांना पाठवाव्यात.

वलि. 'A' च्या अनुषंगाने कार्यवाही स्तव 16/7/24

आ.क्र. 1211 दिनांक 16.07.24

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग**
**छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर**
**एम.बी.सी.टॉवर, दुसरा मजला, बाबा पेट्रोल पंपा जवळ, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर - 431001**

## अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966:**
**क्रमांक:प्र.छा.स./प्रा.यो.हिंगोली/कलम-20(4)/मौ.बळसोंड ता. व जि.हिंगोली/गटक्र.141 (भाग)/सहसंनछसं/**
**दिनांक . .2024**

ज्याअर्थी, हिंगोली जिल्ह्याची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 (सन 1966 चा महाराष्ट्र अधिनियम 37 वा) (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला आहे), चे कलम 15 अन्वये, शासन अधिसूचना,. टिपीएस-1816/994/प्र.क्र.516/16/नवि-13, दि. 01 जानेवारी 2018 अन्वये मंजूर झाली असून ती दि. 02 मार्च 2018 पासून अंमलात आली आहे. (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे उल्लेखिलेला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेतील प्रस्तावानुसार, मौ. बळसोंड, ता.व जि.हिंगोली येथील गट क्र. 141 मधील 1.10 हे. आर क्षेत्र या जमिन (यापूढे ज्यास "उक्त क्षेत्र" असे उल्लेखिलेला आहे);शेती विभागामध्ये समाविष्ट आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम-20 अन्वये वेळोवेळी कराव्या लागणा-या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपध्दतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम-154 अन्वये शासन निर्णय क्र.टिपीएस-1815/प्र.क्र.49/15/नवि-13, दि.06.05.2015 व शासन निर्णय क्र. टिपीएस-1815/प्र.क्र.49/15/नवि-13, दि. 04.01.2016 अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत (यापुढे ज्यास " उक्त शासन निर्णय" असे उल्लेखिलेला आहे), व त्या अनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठीत केली आहे;

आणि ज्याअर्थी,उक्त क्षेत्राचा वापर विभाग बदलून, अटींच्या अधिन राहून शेती विभागाऐवजी सार्वजनिक - निम सार्वजनिक विभाग असा बदलणे आवश्यक असल्याचे "प्रस्ताव छाननी समिती" चे मत झाले होते व त्यानुसार, उक्त अधिनियमाचे कलम 20 चे उप कलम (2) मधील तरतूदीनुसार, उक्त क्षेत्र शेती विभागातून वगळून सार्वजनिक - निम सार्वजनिक विभागात समाविष्ट करण्याकरीता उक्त प्रादेशिक योजना सुधारीत करणे आवश्यक होते. (यापुढे ज्यास " उक्त फेरबदल" असे उल्लेखिलेला आहे.)

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम 151 पोटकलम (1) अन्वये निर्णय क्र. टिपीएस-1815/प्र.क्र. 49/15/नवि-13, दि. 11.6.2015 नुसार कलम 20(2), कलम 20(3) व कलम 20(4) खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगर रचना, यांना प्रदान केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 20 चे पोट-कलम (3) च्या तरतूदीनुसार सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी सूचना क्र. निर्णय क्र. प्र.छा.स./प्रा.यो.हिंगोली/कलम-20(3)/मौ. बळसोंड ता.व जि.हिंगोली/गट क्र.141(भाग)/सहसंनरछसं/1459, दिनांक : 12 सप्टेंबर 2023 अन्वये नागरीकांच्या हरकती / सुचना मागविण्यासाठीची नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी दि. 05-11 ऑक्टोंबर, 2023 रोजी पृष्ठ क्र. 968 ते 969 वर प्रसिद्ध केली आहे व उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत सर्व संबंधीतांकडून विहित मुदतीत सूचना / हरकती दाखल करणा-यांना सुनावणी देण्याकरीता व त्यावरील अहवाल सदस्य सचिव यांना सादर

करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, शाखा हिंगोली यांना "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात आले होते. (यापुढे "उक्त अधिकारी" असे उल्लेखिलेला आहे.);

आणि ज्याअर्थी, आता उक्त कलम-20 (3) च्या सूचनेच्या अनुषंगाने उक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, हिंगोली शाखा यांनी वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सदर प्रकरणी प्रस्ताव छाननी समितीची बैठक दि.23.08.2023 रोजी झालेली असून, त्यात सहायक संचालक नगर रचना, हिंगोली शाखा यांचे पत्र क्र 492 दि.18.07.2022 अन्वये अभिप्राय प्राप्त झालेले आहे. तसेच कलम 20(3) ची अधिसूचना स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले बाबतची देयकाची रक्कम संबंधितांकडून शसकीय कोषागारात भरणा केल्यानंतर व सदर फेरबदलाच्या अनुषंगाने नियमानुसार प्रिमियमची रक्कम भरणा करणेची पुर्तता झालेनंतर व सदस्य सचिव यांनी कलम 20(4) अन्वयेची अंतिम अधिसूचना निर्गमित करणेची कार्यवाही करण्यास मान्यता देण्याचा निर्णय प्रस्ताव छाननी समितीने घेतला आहे.

आणि ज्याअर्थी, अर्जदार यांनी वृत्तपत्र प्रसिध्दी बाबतची रक्कम व जमीन वापर बदलाचे अनुषंगाने अधिमुल्याची रक्कम शासकीय कोषागारत भरणा केली आहे.

आता, त्याअर्थी याबाबतीत शासनाने दि.11.06.2015 चे अधिसूचनेन्वये प्रदान केलेल्या उक्त अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम 20 पोट कलम (4) अन्वये सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर उक्त फेरबदलास खालीलप्रमाणे मंजूरी देत आहे आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीची दि.01.01.2018 ची अधिसुचना सुधारित करण्यात येत आहे.

उक्त प्रादेशिक योजना मंजूरीच्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसुचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

## नोंद

हिंगोली मंजूर प्रादेशिक योजनेतील मौ.बळसोंड ता.व जि. हिंगोली येथील गट क्र. 141(भाग) मधील क्षेत्राचा वापर सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार शेती विभागातून वगळून त्याखालील क्षेत्र खालील अटीवर सार्वजनिक - निम सार्वजनिक विभागात समाविष्ट करणे, असा बदलण्यात येत आहे.

1) शासनाच्या दि. 4.1.2016 शासन निर्णयात व त्यासोबतच्या सहपत्रात नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार, सदर जागेचा विकास करणे बंधनकारक राहील.
2) विषयाधीन जागेचे विकसन करतांना व विकास पश्चात तेथील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा विल्हेवाट/ व्यवस्थापन यांकरिता योग्य ती स्वयंपुर्ण व्यवस्था अर्जदार यांनी स्वखर्चाने करणे आवश्यक राहील.
3) विषयाधीन जागेत Rainwater Harvesting तसेच Water Recycling (पाण्याचा पुर्नवापर) अशा स्वरुपाच्या संकल्पना सदर जमिनीचे विकसन करतांना अंमलात आणणे आवश्यक राहील.
4) विषयाधीन जागेवर अर्जदार/विकसनकर्ता यांनी जागेचे विकसन करतांना प्रति हेक्टरी 250 वृक्ष लावणे बंधनकारक राहील. तसेच विकसीत रेखांकनातील भुखंड धारकाने भुखंडात 5 वृक्ष लावणे बंधनकारक राहील. सदरची बाब विकसनास अंतिम मंजुरी देतांना पडताळणी करण्यात यावी.
5) प्रचलित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील जमिनीच्या उताराच्या अनुषंगाने नमुद मर्यादेत प्रस्तुतच्या जमिनीचा उतार आहे किंवा कसे याबाबत विकास परवानगी देताना हिंगोली शाखा कार्यालयाने शहानिशा करणे आवश्यक राहील.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामाकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

1) जिल्हाधिकारी, हिंगोली
2) सहायक संचालक, नगर रचना, हिंगोली शाखा, हिंगोली.

सदर फेरबदलाची अधिसूचना www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

(र.ना.जायभाये)
सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती,
तथा
प्र.सहसंचालक, नगर रचना,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर